# डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत नोंदणीकृत संस्थांना स्वतःच्या इमारतीमध्ये आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह चालविण्याकरीता जाहिरात

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१८/प्र.क्र.२४९/तांशि-४, दिनांक ९ ऑक्टोंबर, २०१८ अन्वये डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत नोंदणीकृत संस्थांना आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी स्वतःच्या इमारतीमध्ये वसतिगृह चालविण्याकरीता जिल्हा मुख्यालयी (नागपूर येथे) परवानगी देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. याकरीता नोंदणीकृत संस्थांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

---

## अटी व शर्ती

**डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत स्वतःच्या इमारतीमध्ये वसतिगृह चालविण्याकरीता नोंदणीकृत संस्थांना परवानगी देण्यासंबंधीच्या अटी व शर्ती :-**

१) मागणी करणारी संस्था ही मुंबई विश्वस्त कायदा, १९५० किंवा संस्था नोंदणी कायदा, १८६० अंतर्गत नोंदणीकृत असावी.

२) संस्थेचे किमान ३ वर्ष लेखापरिक्षण पूर्ण असणे आवश्यक आहे.

३) जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी कार्यरत असणाऱ्या संस्थांनाच प्राधान्य देण्यात येईल. त्याचप्रमाणे संस्थेची निवड करतांना एका संस्थेची एकच इमारत आवश्यक राहिल.

४) एकापेक्षा अनेक संस्थांची मागणी आल्यास अनुभवी व जास्त क्षमता असणाऱ्या संस्थेला प्राधान्य देण्यात येईल.

५) प्राप्त अर्जांची छाननी करून गुणवत्तेनुसार संस्थेची निवड करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समितीकडे राहील.

६) संस्थेची निवड केल्यानंतर त्या संस्थेशी ५ वर्षाचा करारनामा जिल्हाधिकारी यांचे वतीने करण्यात येईल.

७) डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत नोंदणीकृत संस्थांनी चालविलेल्या अशा वसतिगृहाच्या व्यवस्थापनाकरीता व विद्यार्थ्यांच्या प्रवेशाकरीता शासन निर्णय, दिनांक १० ऑगस्ट, २०१८ अन्वये तयार करण्यात आलेली नियमावली लागू राहील.

८) वसतिगृहामध्ये विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सुविधा जसे वीज, पाणी, इंटरनेट, खाणावळ (जेवणाची व्यवस्था), साफसफाईची व्यवस्था, सुरक्षतेची व्यवस्था इत्यादी पुरविण्याची जबाबदारी निवड केलेल्या संस्थेची राहील. यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत चालविल्या जाणाऱ्या वसतिगृहासाठी विहीत करण्यात आलेले निकष/नियमावली संस्थेने उपयोगात आणावी.

९) सुविधांबाबत कोणत्याही तक्रारी प्राप्त झाल्यास आणि सुविधा असमाधानकारक असल्याचे जिल्हाधिकारी यांचे मत झाल्यास अथवा इमारतीमध्ये गैरकृत्य होत असल्याचे अथवा इमारतीचा वापर अन्य प्रयोजनासाठी करण्यात येत असल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती पूर्वसूचना देऊन व संस्थेचे म्हणणे ऐकून अशा संस्थेशी केलेला करारनामा रद्द करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांचेकडे राहतील.

१०)निवड केलेल्या नोंदणीकृत संस्थेस हे वसतिगृह चालविण्यासाठी कोणत्याही स्वरूपाचे अनुदान शासनाकडून देण्यात येणार नाही. वसतिगृहामध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून प्राप्त होणाऱ्या शुल्कामधून वसतिगृहाचा सर्व प्रकारचा खर्च भागविण्याची जबाबदारी संबंधित नोंदणीकृत संस्थेची राहिल.

११)वसतिगृह चालविण्यासाठी आवश्यक तो कर्मचारी वर्ग कंत्राटी तत्वावर निवड केलेल्या संस्थेने नियुक्त करणे आवश्यक राहील. या कर्मचाऱ्यांचे कोणत्याही स्वरूपाचे दायित्व शासनावर राहणार नाही.

१२)प्राप्त झालेल्या अर्जावर समितीचा निर्णय अंतिम असेल.

१३)अपूर्ण भरलेले व आवश्यक कागदपत्रे न जोडलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१४) सदर जाहिरातीनुसार मागविण्यात आलेले प्रस्ताव कोणत्याही सबबीविना रद्द करण्याचे अधिकार समितीकडे असतील.

१५) सर्व कागदपत्रांसह परिपूर्ण प्रस्ताव सादर करणे बंधनकारक आहे. प्रस्ताव अपूर्ण असल्यास त्रुटी पूर्तता करणेबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१६)परिपूर्ण प्रस्ताव सर्व कागदपत्रांसह अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांवर पृष्ठ क्रमांक टाकून व प्रत्येक पृष्ठावर संस्था सचिवांनी स्वाक्षरी करून दिनांक ०५/०१/२०१९ पर्यंत कार्यालयीन वेळेत सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, सदर, नागपूर यांचे कार्यालयात सादर करावेत व पोच पावती घ्यावी. विहित मुदतीनंतर सादर केलेला अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

१७) ज्या अर्जदार संस्थेच्या प्रस्तावांना वसतिगृह चालविण्यासाठी मान्यता मिळेल ते प्रस्ताव वगळून इतर सर्व संस्थेचे प्रस्ताव अमान्य करण्यात आल्याचे समजावे. त्यासाठी वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१८)निवड करण्यात आलेल्या संस्थेस रू. १.०० लक्ष (रु. एक लक्ष फक्त) इतकी रक्कम अनामत ठेव म्हणून शासन जमा करावी लागेल.

१९)संस्थेने आयकर भरणा केल्याबाबतची माहिती सादर करावी.

20) अर्ज करणाऱ्या संस्थेनी अर्जासोबत EMD म्हणुन रु. 2000/- धनाकर्षाद्वारे (D.D.) भरणा करावा

स्थळ : नागपूर

दिनांक: २७/१२/२०१८